महाराष्ट्र जनशक्ती
ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : ११९ वा | दिनांक : ०३/०२/२०२५ | वार : सोमवार

## देशमुख कुटुंबीयांनी भगवागडावर घेतली महंतांची भेट

**अहिल्यानगर :** सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांनी आज भगवानबाबा गडावर महंत नामदेव शास्त्री महाराज यांची भेट घेतली. या भेटीत धनंजय देशमुख यांनी नामदेव शास्त्री यांच्यासमोर संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींच्या गुन्ह्याची यादी सादर केली. तसेच खूनामागील खरे कारण, आरोपींचा गुन्हेगारीचा इतिहास, त्यांची गुंडगिरी, खंडणीचे प्रकार, अशी सर्व कुंडली नामदेव शास्त्री महाराजांसमोर मांडली. संतोष देशमुख यांचे काय चुकले? असा सवाल करत आरोपींना पाठिशी घालणारे जातीयवाद निर्माण करत असून आम्ही कधीही जातीयवाद निर्माण केला नाही, असे धनंजय देशमुख यावेळी म्हणाले. महंत नामदेव शास्त्री यांनी लगेच भगवानगड हा देशमुख कुटुंबीयांच्या पाठिशी असल्याचे जाहीर केले.

नामदेव शास्त्री यांनी दोन दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांची बाजू घेत त्यांची पाठराखण केली होती. धनंजय मुंडेंची गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. काही नेत्यांनी जातीयवाद उफाळून आणल्याचे ते म्हणाले होते. या पार्श्वभूमीवर संतोष देशमुख यांचे कुटुंबीयांनी आज भगवान गडावर नामदेव शास्त्री यांची भेट घेतली.

धनंजय देशमुख यांनी नामदेव शास्त्रींसमोर आपली बाजू मांडली. देशमुख कुटुंबाने कधीच जातीवाद केला नाही, असे त्यांनी सांगितले. देशमुख कुटुंबियांची जमीन मुंडे कुटुब दोन पिढ्यांपासून कसत असल्याची माहिती त्यांनी महंतांना दिली. प्रामाणिकपणे सांगतो. मनोहर मुंडेचे चार मुले होते. दोन मुले पुण्यात होते. दोन मुले इथे. ते जे पिकवतात, ते आम्ही खातो, असे धनंजय देशमुखांनी सांगितले.

देशमुख कुटुंबाने जातीवाद केला असता तर त्यांच्या हत्येनंतर दिसले असते. माझा भाऊ दलित बांधवाला वाचवण्यासाठी गेला होता. असे धनंजय देशमुख म्हणाले. आमची कोणतीही गुन्हेगारी पार्श्वभूमी नाही. आरोपींवर आतापर्यंत अनेक गुन्हे दाखल झालेले आहेत. आरोपींची मानसिकता तपासण्याची गरज आहे. ज्याला आरोपींची बाजू घ्यायची त्यालाच जातीयवादाचा अंश येत आहे. आम्ही सर्व दाखवले आहे. यांच्या कार्यालयात बसायचे. त्यांच्या गाडीत फिरायचे, असे देशमुख म्हणाले.

संतोष देशमुख यांची अतिशय क्रूर हत्या झाली आहे. प्रत्येक क्षेत्रातील लोक आपल्यासोबत आहे. राजकीय नेते, संप्रदायाचे लोक, सामाजिक कार्यकर्ते, आमच्यासोबत आहेत. न्यायाच्या भूमिकेत आहेत. अशावेळी लोकप्रतिनिधींना जातीयवादी म्हणू नका. नाही तर ते कोणत्याच न्यायाच्या भूमिकेत येणार नाही. न्याय मागणाऱ्या लोकप्रतिनिधींना चुकीचे ठरवू नका, अशी विनंती धनंजय देशमुख यांनी नामदेव शास्त्रींना केली.

धनंजय देशमुखांचे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यानंतर भगवानबाबा गड देशमुख कुटुंबीयांच्या पाठिशी आहे, अशी ग्वाही नामदेव शास्त्री यांनी दिली. ते म्हणाले, भगवान बाबाला मानणारे कुटुंब आहे. यापूर्वी किती वेळा गडावर आले हे त्यांनी दाखवले. भगवान गड तुमच्या पाठीशी कायम राहील, ही ग्वाही देतो.

आरोपींची गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेले पुरावे त्यांनी दिले आहेत. धनंजय यांचे म्हणणे आहे की, याला जातीयवादाचे स्वरुप देऊ नका. भगवान गड कायम स्वरुपी देशमुख कुटुंबाच्या पाठी उभे राहील. आरोपींची खरी पार्श्वभूमी काय आहे, त्यांच्यावर गुन्हे किती आहे, ते त्यांनी दाखवले. जातीयवाद न करता खऱ्या आरोपीला शिक्षा व्हावी, हे गादीवरून सांगणे आहे. आम्ही बसून बोलू, असेही नामदेव शास्त्री म्हणाले.

## "नीट'साठी आधार कार्डवर नाव बंधनकारक

**यवतमाळ :** वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी देशातील जवळपास २५ लाख विद्यार्थी नीट परीक्षा देतात. या वर्षीही ही संख्या अशीच रहाणार आहे. परंतु, परीक्षेच्या तोंडावरच एनटीए मार्फत महत्त्वाची सूचना जारी करण्यात आली आहे. दहावी प्रमाणपत्र आणि आधार कार्ड यावरील नाव सारखेच ठेवण्याचे सांगण्यात आले आहे. तसेच, विद्यार्थ्यांच्या आधारला त्यांचा मोबाइल नंबर लिंक असणे बंधनकारक करण्यात आले आहे. नीट परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी हे बदल करण्यात आले असले तरी पालकांना मात्र परीक्षेच्या तोंडावर करण्यात आलेले हे बदल त्रासदायक ठरतील.

वैद्यकीय शिक्षण घेण्यासाठी आवश्यक असलेली नीट परीक्षा जवळ येत आहेत. त्यासाठी एनटीए मार्फत महत्त्वाची सूचना देण्यात आली आहे. यामध्ये नीट परीक्षेचा फॉर्म भरू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्ड वरील नाव व जन्मतारीख दहावीच्या बोर्ड सर्टिफिकेट वर जसे असेल तसे अपडेट करून घ्यायची आहे. आधार नंबरला मोबाइल नंबर सुद्धा लिंक करून घेणे आवश्यक असणार आहे. याशिवाय बायोमेट्रिक व फोटो अपडेट करून घेणे अपेक्षित आहे.

सूचना पूर्ती केल्यास गैरप्रकार टळू शकतो नीट परीक्षेचा फॉर्म भरण्यासंदर्भात सूचना पूर्ती केल्यास गैरप्रकार टाळला जाऊ शकतो. फिंगरप्रिंट व स्कॅनिंग केल्याने योग्य विद्यार्थीच परीक्षा देईल. त्यामुळे सूचनांची पूर्ती करणे गरजेचे आहे. याशिवाय आधार कार्ड अपडेट केल्याने पुढील विविध स्पर्धा देण्यासाठी किंवा कागदपत्रे काढण्यासाठी सुलभ होईल.

## अवैध लाकडाची वाहतूक करणारा टेम्पो पकडला



**हिंगोली :** कळमनुरी शिवारात अवैधरित्या लाकूड तोड करून वाहतूक करणारा टेम्पो लाकडासह वन विभागाच्या पथकाने रविवारी ता. २ सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास पकडला आहे. या प्रकरणी वन विभागाकडून पुढील कारवाई केली जात आहे. मागील आठवड्यातील ही तिसरी कारवाई असून यामुळे अवैध वाहतूक तोडीवर लगाम बसणार आहे.

हिंगोली जिल्ह्यात वन विभागाच्या आखत्यारीत असलेल्या जमीनीवरून मोठ्या प्रमाणावर अवैधरित्या वृक्षतोड करून त्याची वाहतूक केल्या जात असल्याच्या तक्रारी होत्या. यामध्ये प्रामुख्याने सागवानासह इतर लाकडांचा समावेश आहे. त्यानंतर विभागीय वन अधिकारी डॉ.राजेंद्र नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी सचिन माने यांनी वन परिक्षेत्रांतर्गत कारवाईसाठी भरारी पथकासह स्थानिक अधिकाऱ्यांची पथके स्थापन केली आहेत.

दरम्यान, कळमनुरी शिवारातून एका टेम्पो मधून अवैधरित्या लाकूडतोड करून वाहतूक केली जात असल्याची माहिती वन विभागाला मिळाली होती. त्यावरून विभागीय वन अधिकारी डॉ. नाळे, सहाय्यक विभागीय वन अधिकारी माने यांच्या मार्गदर्शनाखाली वन परिक्षेत्र अधिकारी मीनाक्षी पवार, कर्मचारी काळे, काशीदे यांच्यासह पथकाने आज सकाळ पासून हिंगोली ते कळमनुरी मार्गावर कळमनुरी बायपास जवळ वाहन तपासणी मोहिम सुरु केली होती.

यावेळी एका टेम्पोची (एमएच-०४-सीपी-६११२) तपासणी केली असता त्यात अवैधरित्या लाकूड तोड करून वाहतूक केली जात असल्याचे दिसून आले. यावेळी चालकाकडे चौकशी केली असता त्याला समाधानकारक उत्तरे देता आली नाही. त्यानंतर वन विभागाच्या पथकाने लाकूड व टेम्पो जप्त केला आहे. या प्रकरणी वन विभागाच्या पथकाने पुढील कारवाई सुरु केली आहे. दरम्यान, मागील आठवड्यात हि तिसरी कारवाई असून यामुळे अवैधरित्या लाकुडतोड करून वाहतुकीवर लगाम बसणार असल्याचे चित्र आहे.

Education of the Day
YCMOU सेंटर कोड : 21187
YCMOU मुक्त विद्यापीठात प्रवेशासाठी सुवर्णसंधी
B.A. (मराठी व उर्दू माध्यम)
M.A.- मराठी, हिंदी, उर्दू, अर्थशास्त्र, इतिहास आणि लोकप्रशासन
9405109103, 8830838903

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ फेब्रुवारी २०२५


# कन्नड शहरात दोन गटांत तुंबळ हाणामारी; सात जण जखमी

### परस्पर तक्रारींवरून दोन्ही गटांतील ४० जणांवर गुन्हा दाखल



**कन्नड (राहुल थेटे) :** कन्नड मधील मुलींची छेड काढण्यावरून शहरातील स्नेहनगर भागात दोन गटात तुंबळ हाणामारी झाल्याने सात जण जखमी झाले. ही घटना शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजेच्या सुमारास घडली. या प्रकरणी परस्पर तक्रारींवरून दोन्ही गटांतील ४० जणांवर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेमुळे शहरात तणावपूर्ण शांतता असून चोख पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

गेल्या काही दिवसांपासून एक टोलके मुलींची छेडछाड करीत होते. शुक्रवारी रात्री साडेनऊ वाजेदरम्यान पंकज देवीदास सुरे यांनी त्यांना आबटवाळखोरांचा बंदोबस्त करा, या मागणीसाठी महिलांनी कन्नड शहर पोलिस ठाण्यासमोर ठिय्या आंदोलन केले. महिलांची समजूत काढताना पोलिस निरीक्षक रघुनाथ सानपविचारला, तेव्हा टोळक्याने त्यांना मारहाण केली. यावेळी सुरे हे घरी गेल्यानंतर टोळके तेथेही आले व त्यांना मारहाण करु लागले. तेव्हा आजुबाजुचे लोक जमा झाले. यानंतर दोन्ही गटात तुफान हाणामारी झाली.

याप्रकरणी सुरेयांच्या तक्रारीवरुन १५ ते २० जणांवर गुन्हा दाखल झाला. तर दुसऱ्या गटातील गटातील कैसर कदीर पटेल यांच्या फिर्यादीवरुन १५-२० अशा दोन्ही गटातील जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला, दरम्यान, या हाणामारीत भांडणाची माहिती मिळताच घटनास्थळी पोलिस कर्मचारी प्रवीण बर्डे गेले असता त्यांनाही मार लागल्याने त्यांच्या फिर्यादीवरून दोन्ही गटांवर गुन्हा दाखल करण्यात.शनिवारी सकाळी ११ वाजता पोलिस ठाण्यासमोर महिलांनी ठिय्या देवून रोडरोमियोंचा बंदोबस्त करा, अशी भागणी केली. खबरदारीचा उपाय म्हणून शहरात पोलिसांनी दंगा नियंत्रक पथकाला पाचारण केले होते. देवीदास सुरे, दानेश सलीम पटेल, अनेश शेख रफिक, अमेर शकील पटेल, अबुबकर शेख इलियास, सलीम हुसेन पटेल, कैसर कदीर पटेल हे सातजण जखमी झाले असून त्यांच्यावर ग्रामीण रुग्णालयात उपचार करण्यात आले.

# महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) आणि गर्जे मराठी ग्लोबल यांच्यात सामंजस्य करार, विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी शोधण्याचे प्रोत्साहन



**उमरगा (नागसेन कांबळे) :** महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र (MITSC) आणि गर्जे मराठी ग्लोबल यांच्यात एक ऐतिहासिक सामंजस्य करार करण्यात आला आहे. या कराराचा उद्देश महाराष्ट्रातील मराठी विद्यार्थ्यांना व्यवसाय आणि स्टार्टअप क्षेत्रातील संधींचा शोध घेण्यास प्रोत्साहित करणे आणि त्यांना उद्योजकतेच्या उपक्रमात सहभागी करणे आहे. या सहकार्यातून महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यांमध्ये समित्यांची संरचना केली जाईल. प्रत्येक जिल्ह्यात करियरकट्टा सहकार्याने करिअर संसद पदाधिकारी विद्यार्थ्यांना या समित्यांचा सदस्य बनवून, त्यांना स्थानिक व्यवसायीक, उद्योजक आणि व्यावसायिकांसोबत जोडले जाईल. यामुळे विद्यार्थ्यांना मेंटॉरशिप, नेटवर्किंग संधी, आणि व्यवसाय ज्ञान मिळेल.

समित्या विविध कार्यक्रम, कार्यशाळा, आणि वेबिनार्स आयोजित करून, विद्यार्थ्यांना उद्योजकतेच्या संधी आणि नवकल्पकतेला प्रोत्साहन देईल. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या व्यवसाय संसाधनांची, निधी संधींची, आणि उद्योजकतेतील करिअर मार्गांची जागरूकता वाढेल. या सामंजस्य करारामुळे शंभरहून अधिक देशातील १५००० मराठी उद्योजकांच्या मार्गदर्शनाचा फायदा महाराष्ट्रातील पाच हजार पेक्षा जास्त महाविद्यालयामधील लाखो विद्यार्थ्यांना होणार आहेसामंजस्य करार पुणे येथील विश्व साहित्य संमेलनात मा. रघुनाथ माशेलकर सर यांच्या उपस्थितीत पार पडला. मा. मालशेकर यांच्या मते, हा सामंजस्य करार युवकांना आणि व्यावसायिकांना उद्योजकतेचे उपक्रम आणि स्टार्टअप क्रियाकलपांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करतील. कार्यक्रमासाठी गर्जे मराठी ग्लोबलचे प्रेसिडेंट मा.आनंद गाणू सर, महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे सर, मा. सचिन इटकर सर, मा. विजय तलेले सर, मराठी भाषा विभागाचे संचालका मा. देवरे , पुणे विभागीय उच्च शिक्षण संचालक डॉ. उबाळे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्राचार्य डॉ. वायदंडे, डॉ. घोरपडे, मराठी भाषा विभागाचे सहसचिव डॉ. नामदेव भोसले, प्राचार्य शंकर लावरे , प्राचार्य डी. डी. पाटील सर, प्राचार्य नितीन घोरपडे सर , मा . किरण पाटील आदी उपस्थित होते. या कराराचे लेखन चैत्रा राऊत यांनी केले होते. या सामंजस्य करारामुळे महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना व्यवसाय क्षेत्रात पुढे जाण्यासाठी एक महत्त्वाची दिशा मिळणार आहे.

# नक्षलवाद्यांकडून माजी पंचायत समिती सभापतीची निर्घृण हत्या

**नागपूर :** छत्तीसगड-महाराष्ट्र सीमेवरील भामरागड तालुक्यातील कियेर गावात एक धक्कादायक घटना समोर आली आहे. नक्षलवाद्यांनी माजी पंचायत समिती सभापती सुखदेव मडावी (४५) यांची निर्घृण हत्या केली. पोलिसांना माहिती पुरवत असल्याच्या संशयावरून हे कृती करण्यात आले.

घटनेचा तपशील असा की, १ फेब्रुवारी रात्री तीन नक्षलवाद्यांनी मडावी यांना त्यांच्या घरातून जबरदस्तीने उचलून नेले आणि जंगलात त्यांची गळा दाबून हत्या केली. २ फेब्रुवारी सकाळी गावाजवळ त्यांचा मृतदेह आढळला. मृतदेहाजवळ नक्षलवाद्यांनी एक पत्रक ठेवले होते, ज्यात त्यांनी मडावी हे पोलिसांचा खबरी असल्याचा आरोप केला.

या घटनेचे मूळ कारण म्हणजे पोलिसांनी नुकतेच छत्तीसगड सीमेवरील पेनगुंडा आणि नेलगुंडा येथे पोलिस मदत केंद्र स्थापन केले होते. या कारवाईमुळे नक्षलवाद्यांची चारही बाजूंनी कोंडी झाली होती. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी स्पष्ट केले की, मृतक सुखदेव मडावी हे वास्तविक पोलिसांचे खबरी नव्हते.

पोलिसांच्या तपासात असे समोर आले की, भामरागड परिसरात माओवाद्यांच्या कंपनी क्र. १० मधील ८ सदस्यांपैकी तीन जणांनी हे कृत्य केल्याचा संशय आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षभरात नक्षलवाद्यांनी केलेली ही पहिलीच हत्या आहे. या घटनेनंतर परिसरात नक्षलविरोधी अभियान अधिक तीव्र करण्यात आले आहे.

गेल्या काही वर्षांत पोलिसांनी या भागात नक्षलवाद्यांविरुद्ध कठोर कारवाया केल्या आहेत, ज्यामध्ये अनेक जहाल माओवाद्यांचा खात्मा करण्यात आला, तर काहींनी आत्मसमर्पण केले. मात्र अशा परिस्थितीतही नक्षलवादी आपल्या हिंसक कारवाया सुरूच ठेवत आहेत.




महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ फेब्रुवारी २०२५

# गडी थोडक्यात हुकला, नाहीतर गाठले होते



**इंदापूर :** विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांना टोला लगावला आहे. पुढची चार वर्षे विधानपरिषदेची आमदारकी असतानाही तुम्ही विधानसभेची निवडणूक का लढवली? असे लोक विचारत होती. पण ज्याने आपल्याला पाडले त्याला पाडायची इच्छाशक्ती दांडगी होती. गडी थोडक्यात हुकला, ती बी थोडा फार दगाफटका झाला म्हणून नाहीतर गाठले होते, असा टोला राम शिंदे यांनी रोहित पवारांना लगावला आहे.

राम शिंदे म्हणाले, चांगले काम करणे हे वाईट असेट हे मला उशिरा कळाले. आमच्या मतदारसंघाचा माणूस भेटला नाही बाहेरून पाठवला. मागच्या वेळी ४३ हजार मतांचा फरक होता यावेळी १२४३ मताचा फरक राहिला. क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थितीत इंदापुरात सभापती राम शिंदे यांचा भव्य नागरी सत्कार पार पडला. यावेळी राम शिंदे बोलत होते.

रोहित पवारांवर बोलताना राम शिंदे म्हणाले, ज्यांच्याकडून पराभव झाला ते २८८ मध्ये येतात आणि वरील सभागृहात ७८ आहेत असे ३६८ जण सभागृहात आहेत. राज्याला एक सभापती आहे तो सगळ्या आमदारांचा सभापती असतो. त्याच्यामुळे 'हार कर भी बाजीगर' अशी ती भानगड झाली आहे. काय त्यांच्यावर बेतली असेल तुम्हीच जाणून घ्या, असे राम शिंदे म्हणाले.

आमच्या मतदारसंघातील लोक म्हणतात हजार पाचशे मते कमी पडली होती. यालाच दिली असती तर बर झाले असते, नाहीतर हे निवडून दिलं याचा काय उपयोग नाही आगे बी नाही आणि पीछे बी नाही, असाही टोलाही राम शिंदे यांनी रोहित पवारांना लगावला आहे. राज्यात नाही केंद्रात नाही, कामे होण्याची काही शक्यता नाही. कोणत्याही पार्टीकडून काम आणले तर कोणी एकले तर मी सध्या तीनही पक्षाचा सभापती आहे, असे राम शिंदे म्हणाले.

लोक म्हणतात राम शिंदे नशीबवान आहे, मी तर नशीबवान आहेच. कारण पण पडलो तरीही आमदार झालो, सभापती झालो. जे पडले आहेत त्यांची काय अवस्था आहे. राज्यातील सगळी लोकं म्हणतात येऊ का? २८८ मध्ये २४० आमदार सत्तेत आहेत. महाराष्ट्रात विरोधी पक्षनेता राहिला नाही, विरोधात राहून करतील काय? निवडून आलेल्या २४० मधील ४२ मंत्री आहेत, १९८ आमदार आहेत आणि मी सभापती आहे असेही राम शिंदे म्हणाले. मी झोपल्यावर कधी कधी विचार करतो, आपले बरे झाले का वाईट झाले. जरी निवडून आलो असतो तरी ४२ मध्ये मिळाले असता की नाही तो वेगळाच भाग असल्याचे राम शिंदे म्हणाले.

राम शिंदे म्हणाले, मला तालुकाध्यक्ष होण्यास १० वर्षे लागली. विधान परिषदेचा सभापती व्हायला मला अडीच वर्षे लागली. विधान परिषदेला १०० वर्षे झाली आहेत. माझ्या एवढ्या तरुण माणसाला पहिल्यांदा सभापतीपद मिळालं आहे. कारण ते वरिष्ठ आणि ज्येष्ठांचं सभागृह आहे. पण कनिष्ठांना संधी मिळाली. आमदाराला आठ फेऱ्या विमानाच्या फुकट आहेत, सभापतीला कंटाळा येईपर्यंत आहेत. मंत्रालयात कोणत्या मंत्र्यांनी आमदाराने नागरिकांना दालनात यायला पास नाही दिला तर थेट मला फोन करा, कारण पास मीच देतो. सगळ्या आमदारांच्या पगारावर सह्या माझ्या आहेत, असेही राम शिंदे यावेळी म्हणाले.

# कट्टर विरोधकांनी घेतली गळाभेट



**भंडारा :** भंडारा जिल्ह्यातील पिंपळगाव येथे शंकरपट शताब्दी महोत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाच्या कार्यक्रमात राजकीय कट्टर विरोधक नेते एकाच मंचावर पाहायला मिळाले. कॉंग्रेस नेते नाना पटोले आणि अजित पवार गटाचे प्रफुल्ल पटेल या दोघांनी गळाभेट देखील घेतली आहे. या भेटीमुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली आहे.

भंडारा गोंदिया लोकसभा क्षेत्रात तसेच यातील येणारे सातही विधानसभा मतदारसंघात आपलेच वर्चस्व ठेवण्याचे प्रयत्न या दोन्ही नेत्यांकडून केले जातात. राजकीय व्यसपीठांवरून एकमेकांवर आरोप टीका करणारे प्रफुल्ल पटेल आणि नाना पटोले हे यावेळी एकाच मंचावर उपस्थित होते तसेच या दोघांमध्ये गप्पा देखील झाल्याचे पाहायला मिळाले.

विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभांमध्ये बोलताना अनेकवेळा महाविकास आघाडीच सत्तेत येणार आणि मुख्यमंत्री पदावर नाना पटोले यांनी दावा देखील केला होता. आमगाव येथे भाषणात बोलताना नाना पटोले म्हणाले होते, राजकुमार पुराम याला आमदार बनवायचे आहे. नाही बनवलं तुम्ही तर महाराष्ट्रात नानाभाऊ उद्या काय बनणार आहे हे तुम्हाला माहीतच आहे. तुम्ही एक एक आमदार नाही दिले तर अडचण येणार आहे, असे म्हणत नाना पटोले यांनी मुख्यमंत्रिपदासाठी अप्रत्यक्ष होकार दिल्याचे दिसून आले होते.

नाना पटोले यांच्या या विधानवार प्रफुल्ल पटेल यांनी जोरदार पलटवार केला होता. ते म्हणाले होते, नाना पटोले हे स्वयंभू घोषित मुख्यमंत्री आहेत. अशा म्हणण्याने कुणी काही बनत नाही. महाराष्ट्रामध्ये तुमचे सरकार आले पाहिजे. असा पलटवार प्रफुल्ल पटेल यांनी केला होता. असे हे दोन्ही नेते एकमेकांचे कट्टर विरोधक असून देखील आज एकाच मंचावर दिसून आले. यावेळ त्यांच्यात झालेली गळाभेट देखील सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.

# मुंबई विमानतळावर कारच्या धडकेत ५ जण जखमी




**मुंबई :** मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावर रविवारी सकाळी मर्सिडीज कारने धडक दिल्याने दोन परदेशी नागरिकांसह पाच जण जखमी झाले. टर्मिनल २ च्या पार्किंगमध्ये हा अपघात झाला. बेदरकारपणे गाडी चालवल्याप्रकरणी चालकाला अटक करण्यात आली आहे.

जखमींमध्ये दोन परदेशी नागरिकांना नानावटी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. विमानतळावरील तीन क्रू मेंबर्सही जखमी झाले असून त्यांच्यावर कूपर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

कार चालवत असलेल्या परशुराम चिंचोलाप्पा दादनवरे यांनी ब्रेकऐवजी एक्सलेटर दाबल्याचा दावा पोलिसांनी केला आहे, त्यामुळे हा अपघात झाला.

CSMIA च्या प्रवक्त्यांनी सांगितले की, "आज सकाळी CSMIA येथे, T२ च्या डिपार्चर लेनमध्ये चालकाचे कारवरील नियंत्रण सुटले, त्यामुळे पाच जण जखमी झाले. विमानतळ वैद्यकीय पथकाने तातडीने प्राथमिक उपचार करण्यासाठी घटनास्थळी धाव घेतली असून जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. CAMIA पोलिस आणि इतर टीमसोबत प्रवाशांच्या सुरक्षेसाठी काम करत आहे."

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), सोमवार ०३ फेब्रुवारी २०२५

## छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्याला यश



**नाशिक** : राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांच्या पाठपुराव्याला यश मिळाले असून त्यांच्या विशेष प्रयत्नांतून मनमाड-नाशिक-देवळाली ७९ कि. सेक्शनवर "कवच ४.० प्रणाली" मंजूर करण्यात आली आहे. या प्रणालीसाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली असून या प्रणालीमुळे आगामी कुंभमेळ्याच्या काळात रेल्वेने येणाऱ्या भाविकांच्या सुरक्षित रेल्वे प्रवासासाठी खूप मोठा फायदा होणार आहे. छगन भुजबळ यांनी दि. ५ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णवजी यांना यासंदर्भात पत्र लिहून मागणी केली होती. या पत्राला सकारात्मक प्रतिसाद देत रेल्वे मंत्रालयाकडून हा निर्णय घेण्यात आला आहे.

कवच ही उच्च तंत्रज्ञानावर आधारित स्वदेशी विकसित ऑटोमॅटिक ट्रेन प्रोटेक्शन (ATP) प्रणाली आहे, ज्यासाठी सर्वोच्च ऑर्डर (SIL-4) सुरक्षा प्रमाणपत्र आवश्यक आहे. लोको पायलट तसे करण्यात अयशस्वी झाल्यास कवच हे लोको पायलटला विशिष्ट वेग मयदित ट्रेन चालवण्यास मदत करते आणि ट्रेनला खराब हवामानात सुरक्षितपणे धावण्यास मदत करते. या कवच प्रणालीच्या अंमलबजावणीमध्ये प्रत्येक स्टेशन, ब्लॉक विभागात स्टेशन कवच बसवणे, ट्रॅकच्या संपूर्ण लांबीमध्ये RFID टॅगची स्थापना करणे, संपूर्ण विभागात दूरसंचार टॉवरची स्थापना, ट्रॅकच्या बाजूने ऑप्टिकल फायबर केबल टाकणे, भारतीय रेल्वेवर धावणाऱ्या प्रत्येक लोकोमोटिव्हवर लोको कवचची तरतूद करण्यात आलेली आहे.

कवच आवृत्ती ४.० मध्ये विविध रेल्वे नेटवर्कसाठी आवश्यक असलेली सर्व प्रमुख वैशिष्ट्ये समाविष्ट असून भारतीय रेल्वेच्या सुरक्षेतील हा एक महत्त्वाचा टप्पा आहे. आवृत्ती ४.० मधील प्रमुख सुधारणांमध्ये वाढलेली स्थान अचूकता, मोठ्या आवारातील सिग्नल पैलूंची सुधारित माहिती, OFC वर स्टेशन ते स्टेशन कवच इंटरफेस आणि विद्यमान इलेक्ट्रॉनिक इंटरलॉकिंग सिस्टमचा थेट इंटरफेस समाविष्ट आहे.

रेल्वेकडून कवचच्या सुमारे १५ हजार किमीच्या ट्रॅक साइड कामांसाठी निविदा मागवण्यात आल्या आहेत. तसेच सर्व संबंधित अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय रेल्वेच्या केंद्रीकृत प्रशिक्षण संस्थांमध्ये कवचचे विशेष प्रशिक्षण कार्यक्रमही आयोजित केले जात आहेत. आतापर्यंत ९ हजारांहून अधिक तंत्रज्ञ, ऑपरेटर आणि अभियंते यांना कवच तंत्रज्ञानावर प्रशिक्षण देण्यात आले आहे.

त्यानुसार मनमाड - नाशिक - देवळाली या ७९ किमीच्या रेल्वेमार्गासाठी या "कवच ४.० प्रणाली"ची अंमलबजावणी करण्यात आल्यानंतर रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेत मोठी भर पडणार असणार आहे. याचा फायदा आगामी २०२७ मध्ये होऊ घातलेल्या नाशिकच्या सिंहस्थ कुंभमेळ्यादरम्यान तर होणार आहे. त्याचबरोबर नंतरच्या काळातही नाशिक विभागातील रेल्वे प्रवाशांना सुरक्षित रेल्वे प्रवास कायमस्वरूपी अनुभवता येणार आहे.

## महाकुंभ- प्रयागराजमध्ये ३ दिवस वाहनांना प्रवेश बंद



**प्रयोगराज** : महाकुंभात ३ फेब्रुवारीला बसंत पंचमीचे अमृत स्नान आहे. पुन्हा एकदा गर्दी वाढू लागली आहे. चेंगराचेंगरीनंतर प्रशासनाचे सर्वाधिक लक्ष गर्दी व्यवस्थापनावर आहे. २ ते ४ फेब्रुवारी या कालावधीत संपूर्ण यात्रा परिसरात वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. व्हीव्हीआयपी वाहनांचे पासही रद्द करण्यात आले आहेत. सर्व ९ रेल्वे स्थानकांवर वन-वे प्रणाली लागू करण्यात आली आहे. म्हणजे भाविक एका लेनमधून आत जातील आणि दुसऱ्या लेनमधून बाहेर पडतील.

भाविकांना त्यांची वाहने शहराबाहेरील पार्किंगमध्ये उभी करावी लागणार आहेत. तुम्ही ट्रेनने येत असाल तर तुम्हाला रेल्वे स्टेशनवर उतरावे लागेल. रेल्वे स्थानकापासून पार्किंग आणि शटल बसची सोय आहे. मात्र, बस उपलब्ध न झाल्यास संगम येथे पायी जावे लागेल व परतावे लागेल. पार्किंग आणि स्टेशनपासून संगमपर्यंतचे अंतर ८ ते १२ किमी आहे.

## हिंदीत बोलायची गरज काय, मराठी भाषेचा अभिमान बाळगा - राज ठाकरे



मुंबई : महाराष्ट्र शासनाचा विश्व मराठी संमेलन २०२५ हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे सांगता समारंभ आज पार पडला. यावेळी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे देखील उपस्थित होते. राज ठाकरे यांनी कार्यक्रमातील भाषणात बोलताना मराठी भाषेवर व भाषेच्या संवर्धनावर भाष्य केले आहे.

राज ठाकरे म्हणाले, आपण आपल्या भाषेवरती ठाम राहिले पाहिजे. फ्रेंच लोक त्यांच्या भाषेविषयी इतके प्रामाणिक असतात की तुम्हाला त्यांचा अभिमान वाटायला लागतो. आपल्या देशात सुद्धा आहेत. आणि जर बाकीचे राज्य जर भाषेबद्दल अभिमान बाळगून असतील तर आपण दुसऱ्या भाषेमध्ये का बोलायला जातो. आपल्याकडची मुलं आपल्याकडच्या मुली हे हिंदीमध्ये बोलायला जातात इंग्रजीमध्ये बोलत असतात अनेक वेळा भेटल्यानंतर हिंदीमध्ये बोलतात, का बोलायचं हिंदीमध्ये. असा सवालही यावेळी राज ठाकरे यांनी उपस्थित केला.

राज ठाकरे म्हणाले, आता आपल्या येथे राज्य गीत लावण्यात आले होते. मला सांगा कोणत्या राज्याचं राज्य गीत आहे. जय जय आसाम माझा.. जय जय गुजरात माझा.. जय जय महाराष्ट्र माझा. पहिली गोष्ट आपण लक्षात घेतली पाहिजे की आज आपण या भूप्रदेशावरती हिंद प्रांतावर कारण हा देश जो काही आहे हिंदुस्तान भारत १९४७ रोजी झाला. पण या संपूर्ण हिंद प्रांतावरती जी आक्रमणे झाली ती सगळी बाहेरून आली आहेत या हिंदू प्रांतावर जर कोणी राज्य केलं असेल सव्वाशे वर्ष तर ते या भागातल्या फक्त मराठ्यांनी केले आहे. इतर कोणीही राज्य केलेले नाही जे कोणी केले ते बाहेरून आले होते. जे राज्यकर्ते होते त्याच्या राज्याची जी भाषा आहे ती भाषा आपण वृद्धिंगत नाही करायचे तर मग काय करायचे.

मगाशी उदय सामंत म्हणाले होते की जे जे आम्ही सांगू ते ते मराठी भाषेसाठी केले जाईल. तसेच आमचे असे पण इच्छा आहे की आम्ही जे जे करू त्याला देखील तुमचा पाठिंबा मिळायला हवा. तेव्हा फक्त केसेस टाकू नका, माझा मागचा अनुभव सांगितला बाकी काही नाही. कारण जे जे मराठी भाषेसाठी करतोय आम्ही आमच्या परीने करतोय. तुमचे बहुतेक मशागत करण्यासाठी ही सगळी मंडळी बसली आहे. असं राज ठाकरे यावेळी म्हणाले.

आमच्या सदानंद मोरे यांची व्याख्याने तुम्ही युट्युब वर ऐका. ती ऐकल्यानंतर तुम्हाला लक्षात येईल की आपण मराठी आहोत म्हणजे नेमके काय आहोत. मी अनेकदा माझ्या भाषणांमध्ये सांगत आलो आहे की, पुन्हा एकदा सांगतो. माणसाचे जे अस्तित्व असते किंवा एखाद्या भाषेचं जे काही अस्तित्व असतं ते जमिनीवरती असतं. आपण नेहमी म्हणतो आमचा इतिहास आमचा इतिहास जगाचा इतिहास पण इतिहास म्हणजे काय, इतिहास म्हणजे भूगोल. हिटलर असेल औरंगजेब असेल यांनी ठरवावं लागतं की मला हा भूप्रदेश हस्तगत करायचा आहे. तू भूप्रदेश हस्तगत केल्यानंतर तो बनतो इतिहास. सगळ्या इतिहास काढून पाहिल्यानंतर तुम्हाला लक्षात येईल हे आपण इतिहास कशाला म्हणत आहोत आणि ती एकदा जमेल तुमच्या पायाखालन सरकली की तुमचं अस्तित्व गायब. त्यामुळे भूगोलाशिवाय इतिहास नाही.

आपण मराठी संमेलन मराठी साहित्य संमेलन वगैरे भर होतो पण मराठी माणसाच्या अस्तित्वासाठीच संमेलन हे शहरा शहरांमध्ये भरवला पाहिजे ही माझी शासनाकडे विनंती आहे. आपण ते अस्तित्व टिकवलं पाहिजे. नुकत्याच प्रगतीच्या नावावर ती आमच्याकडच्या जमिनी जाणार असतील मला असं वाटतं त्याला विकास नाही म्हणत. विकास नसतो. आपलं अस्तित्व पुसण्याचा तो एक प्रकारचा डाव असतो. एखाद्या कंपन्याने माझ्या इथली ५००० एकर जमीन विकत घेतली जमीन विकत घेतली म्हणजे काय की त्या ५००० एकर मधली सगळीगेली बाहेर कुठे गेली काय गेली माहित नाही. मला असं वाटतं इतिहासातून आपण जर काही बोध घेणार नसो तर इतिहास न वाचलेला बरा.

३७० कलम हटवले म्हणजे नेमके काय याचा अर्थ काश्मीरमध्ये स्वत:ची जमीन घेऊ शकतो. खरंच तिथे अजून कोणी जमीन घेतली आहे की नाही ते माहीत नाही. खरे तर तिथे अंबानी आणि अदानी यांनी जागा घेतली पाहिजे. लोकांना विश्वास बसेल की आता जायला हरकत नाही. तुम्हाला गंमत म्हणून सांगतो हे फक्त कश्मीर पुरतं नाहीये. तुम्ही जर आता हिमाचल प्रदेश मध्ये जरी गेलात तरी हिमाचल प्रदेश मध्ये जमिनीचा तुकडा घेऊ शकत नाही. भारतीय असून सुद्धा. आम्हीच का मोकळीक दिली आहे? तुम्ही या जमीन घेऊन जा, तुम्ही या जमिनी घेऊन जा. अहो तुमचा अस्तित्व टिकलं नाही भाषा कुठून टिकेल, राज ठाकरे यांनी म्हटले.